जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र ९८१९२०८२७९

**प्रेसनोट** दिनांक २९.१२.२०२४

## ''अट्टल मोटारसायकल चोरांस शिताफीने अटक''

दिनांक.२८.१२.२०२४ रोजी उल्हासनगर युनिट ४ च्या पोलीसांना मिळालेल्या गुप्त बातमी वरून त्यांनी अमरडाय कंपनी जवळ उल्हास नदीकडे जाणाऱ्या रोडवर सापळा रचुन तेथे ३ इसम नामे (१) रवी अर्जुन जैस्वार, वय २३ वर्षे (२) आशिष राजकुमार गुप्ता वय २३ वर्षे (३) साबेद उर्फ बाबू मुन्ना रिझवी वय – २२ सर्व रा. आशेळे गाव उल्हासनगर हे दुचाकी वरून संशयित फिरत असताना दिसले. त्या अनुषंगाने त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांच्या ताब्यात असलेली एक ब्राऊन रंगाची टि व्ही एस जुपिटर गाडी मिळून आली सदर दुचाकीचा अभिलेख तपासला असता सदरची गाडी मध्यवर्ती पो.स्टे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १२४९/२०२४ बी एन एस ३०३(२) प्रमाणे चोरीची असल्याचे समजले. त्या वरून सदर इसमांची कसून चौकशी केली असता त्यांनी यापुर्वी मध्यवर्ती पो स्टे, नारपोली पो स्टे व कल्याण तालुका पो स्टे चे हद्दीत एकुण ४ गुन्हे व वेगवेगळया कंपनीच्या ७ मोटारसायकली चोरी केल्याचे कबुल केले असुन त्यांचे कडून एकुण २,९८,०००/– रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १ श्री.शेखर बागडे यांचे मार्गर्शनाखाली उल्हासनगर गुन्हे शाखा युनिट ४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कोळी, सपोउपनि/बांडे, पोहवा/गणेश गावडे, पोहवा/योगेश वाघ, पोहवा/मंगेश जाधव, पोहवा/प्रकाश पाटील, पोहवा/रितेश वंजारी, पोशि/राजेंद्र थोरवे, पोशि/संजय शेरमाले, पोशि/प्रसाद तोंडलिकर यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर